ISBN : 978-93-24457-18-4

Junnar Taluka Shivner Shikshan Prasarak Mandal's

# Shri Shiv Chhatrapati College

(Arts - Commerce - Science)

Bodkenagar, Junnar - 410 502

Tal - Junnar, Dist- Pune ( Maharashtra )

NAAC Accreditation 'A' Grade

S. P. Pune University

## ONE DAY STATE LEVEL SEMINAR

## ON

# "Food Problem in India"

**Editor - In - Chief**
Mr. Sachin Kasbe
(Assistant Professor)

**Offg. Principal**
Dr. Bhaskar Shelke



Scanned by CamScanner

One day State Level Seminar

on

# "Food Problem in India"

21 January, 2017

Sponsored by

Savitribai Phule Pune University,

B. C. U. D., Pune

Organised by

DEPARTMENT OF ECONOMICS

Shri Shiv Chhatrapati College

Bodkenagar, Junnar - 410 502

Tal- Junnar, Dist- Pune. Maharashtra

Email : ssccj@yahoo.co.in

sscjeconomics@gmail.com/ skasbe358@gmail.com

website : www.ssccollegejunnar.org



Scanned by CamScanner

# INDEX


| Sr. No | संशोधन पेपरचे नाव | संशाोधकाचे नाव | Pg. No. |
|---|---|---|---|
| 1 | Food Problem in India : Nature and Causes | Dr. S. N. Babar | 1 |
| 2 | Food Security Act (2013) Issues, Challenges | Dr. Maroti Tegampure<br>Dr. Amrita Sahu | 5 |
| 3 | Food Problems in India | Dr. Sandipan R. Gavhale | 10 |
| 4 | भारतातील अन्नसुरक्षा : समस्या आणि उपाययोजना | डॉ. श्रीकांत एम.फुलसुंदर | 13 |
| 5 | A WAR AGAINST FOOD INSECURITY: THE CASE OF FOOD SECURITY ARMY (FSA) OF KERALA | Sreenath Unnikrishnan | 18 |
| 6 | The Present Scenario Of Hunger Problem In India | Prof. Shivanand Kabburi | 22 |
| 7 | A Review of Food Production in India | Mr. Sachin Nagorao Kasbe | 24 |
| 8 | Malnutrition In India : An Analytical Study | Dr. Faruk Najir Shaikh | 29 |
| 9 | A situational analysis of agricultural production: challenges of food security and suggestions | Nagesh M. Suryawanshi | 35 |
| 10 | Food Security in India | Dr. M. M. Jadhav<br>Prof : R. L. Thorave | 41 |
| 11 | The Importance of Snacking for Athletes | ANIL KISAN BADE | 44 |
| 12 | A serious problem of food preservation on Human Health | Dr. Sadashiv Sitaram Mengal | 47 |
| 13 | Challenges of Food Production | Prof.Ashok U. Bhairat<br>Prof. G. B. Hole | 49 |
| 14 | Food Grain Production in India: Trend, Availability and State Level Differences | Dr. Pramod Pandurangrao Lonarkar | 54 |
| 15 | Some Aspect of Food Security in India | Madhav Shinde<br>Ganesh Mangade<br>Jivan Solanke | 59 |
| 16 | Climate change and food security in India | Mr. Gore Narayan S. | 64 |
| 17 | Public Distribution System | Dr. Deepak Bhusare | 68 |
| 18 | भारतातील अन्नसुरक्षा आव्हाने आणि उपाय | प्रा. डॉ. भूषण अण्णा वायकर | 72 |
| 19 | भारतातील अन्न सुरक्षा – आव्हाने व आवश्यक बाबी (अडचणी) | प्रा. सौ. सुप्रिया हेमंत काळे | 75 |
| 20 | भारतीय अन्नसुरक्षेसमोरील समस्या व आव्हाने | प्रा. ज्ञानेश्वर गोविंद भांबुरे | 78 |




Scanned by CamScanner

 ISBN : 978-93-24457-18-4

# भारतातील अन्न सुरक्षा – आव्हाने व आवश्यक बाबी (अडचणी)

**प्रा. सौ. काळे सुप्रिया हेमंत**
सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग
श्री शिव छत्रपती महाविद्यालय,जुन्नर
मो.नं. 9175030640
Email- supriyakale1986@gmail.com

**प्रस्तावना.**

भारत हा कृषीप्रधान देश आहे. या वाक्यावरुन भारतामध्ये असलेले शेती व अन्नधान्य या घटकांचे महत्व लक्षात येते. परंतु या वाक्याबरोबरच भारत हा विकसनशील देश आहे हे सत्यही तितकेच महत्वाचे ठरते. त्यामुळे विकसनशील देशामध्ये विकासाचे निर्माण होणा–या अडथळयांपैकी लोकसंख्या वाढ आणि शेतीविषयक प्रगती या दोन्ही घटकांमध्ये चढउतार चालू असतात. परंतु आत्तापर्यतच्या अभ्यासात असे लक्षात येते की लोक संख्यावाढ ही अन्न उत्पादकतेवर प्रभावी ठरते आणि हे मत 18 व्या शतकात ब्रिटिश अर्थतज्ञ रॉबर्ट माल्थस यांनी आपल्या लोकसंख्या विषयक सिध्दांत या सिध्दांतामध्ये स्पष्ट केल्याचे दिसते. लोकसंख्याविषयक सिध्दांत या सिध्दांतामध्ये स्पष्ट केल्याचे दिसते. माल्थसच्या मते लोकसंख्या ही भूमिती श्रेणीने वाढते तर शेती उत्पादन मात्र गणिती श्रेणीने वाढते.[1]

माल्थसच्या 18 व्या शतकातील सिध्दांत सदयस्थितीतही लागू असल्याचे दिसते व त्यासाठीच अन्नसुरक्षा यासारख्या अन्नाला संरक्षण देणा–या संकल्पनांचा स्वीकार होऊ लागला. आणि आज संपूर्ण जग अन्नधान्य टंचाई निवारण्यासाठी प्रयत्न करताना दिसते.

**अभ्यासाची उदि्दष्टये –**

1. अन्नसुरक्षा संकल्पनेचा अर्थ व संकल्पना अभ्यासणे.
2. अन्न सुरक्षा कायदा संबंधित माहिती अभ्यासणे.
3. भारतातील अन्नसुरक्षा व आव्हाने याविषयी माहिती जाणून घेणे.
4. अन्न सुरक्षा आव्हानांच्या निराकरणासाठी उपाययोजना सुचविणे.

**संशोधन पध्दती –**

प्रस्तुत शोधनिबंधाचा विषय भारतातील अन्न समस्या असून त्यापैकी एक समस्या अन्न सुरक्षा – आव्हाने व आवश्यक बाबी अडचणी हा आहे. यामध्ये राष्ट्रीय अन्नसुरक्षा कायदयाचा आधार घेतला आहे. तसेचा भारतातील अन्नसुरक्षेची योग्य व सखोल माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला आहे. संबंधित माहिती मिळवण्यासाठी दुय्यम साधनसामग्रीचा अवलंब केला आहे. त्यासाठी संदर्भ ग्रंथ, मासिके, साप्ताहिके, वृत्तपत्र, शोधनिबंध,सरकारची प्रसिध्द पत्रके यांचा वापर करण्यात आला आहे.

**अन्नसुरक्षा अर्थ व संकल्पना –**

अन्न सुरक्षा निर्मितीसाठी देशात पुरेसे धान्य उपलब्ध असणे आवश्यक असते. सरकारच्या धोरणामुळे तसेच शेती क्षेत्रातील बदलामुळे, अन्नधान्य उत्पादकतेवर अनुकूल किंवा प्रतिकुल परिणाम झाल्याचे दिसून येते. योग्य प्रमाणात भोजन उपलब्ध होवू न शकल्यामुळे समाजात दारिद्रय, कुपोषण, उपासमार यांसारख्या गंभीर समस्या निर्माण होतात. या समस्यांवर मात करण्यासाठी अन्नसुरक्षा या संकल्पनेचा उगम झाला.

जागतिक विकास अहवाल –1986 नुसार, "सर्व व्यक्तिंना सर्व कालावधीसाठी आवश्यक मुलभूत भोजनासाठी आहारासाठी भौतिक आणि आर्थिक अशा दोन्ही स्वरुपात अन्नधान्याच्या उपलब्धतेची हमी देणे म्हणजे अन्नसुरक्षा होय".

अन्नधान्य आणि कृषि संघटन–1983 नुसार, "सर्व व्यक्तिना सर्व कालावधीसाठी आवश्यक मुलभूत भोजनासाठी(आहारासाठी) भौतिक आणि आर्थिक अशा दोन्ही स्वरुपात अन्नधान्याच्या उपलब्धतेची हमी देणे म्हणजे अन्नसुरक्षा होय ".[2]

**अन्न सुरक्षा म्हणजे काय?** .

1966 मध्ये संयुक्त राष्ट्र संघाच्या अन्न व शेती संघटनेने अन्न सुरक्षेची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. सर्व जनतेला कियाशील व सशक्त आयुष्याकरिता आहारविषयक गरजापूर्ती व अन्न प्राध्यान्यकम भागविण्यासाठी सदासर्वकाळ पुरेसे, सुरक्षित व सकस अन्न प्रत्यक्ष व आर्थिकदृष्टया सुसाध्य असणे हे अन्न सुरक्षेचे लक्षण आहे.

अमेरिकेतील शेती विभागाने म्हटले आहे की, आरोग्यपूर्ण व कियाशील विकासासाठी कुटुंबातील सर्व सदस्यांना केव्हाही पुरेसे अन्न मिळू शकणे यास कुटुंबाची अन्न सुरक्षा म्हणतात.[3]



Scanned by CamScanner

वरील व्याख्यांवरुन पुरेसे, सुरक्षित, सकस, तात्काळ अन्न उपलब्ध होण्याची क्षमता म्हणजे अन्न सुरक्षा होय. ही अन्नसुरक्षा निर्माण होण्यासाठी देशातील जनतेकडे पुरेशी क्रयशक्ती असणे आवश्यक असते. देशातील अनेक आर्थिक समस्या या अन्न असुरक्षिततेची कारणे व परिणाम दोन्ही आहेत. अनेक वेळा लोकांच्या भूकबळी किंवा उपासमाराचे कारण अन्नधान्याची कमतरता नसून धान्य खरेदी करण्याची जनतेची कुवत व क्षमता नसते हे आहे. जगात अति गरिबीमुळे उपासमार, दारिद्र्य, कुपोषण या समस्या निर्माण होतात. अन्न सुरक्षेच्या गांभीर्याकडे पाहण्यासाठी प्रथम या समस्यांचा अभ्यास होणे गरजेचे आहे.

**अन्न सुरक्षेवरील सिध्दांत –**

अन्नसुरक्षा या संकल्पनेचे गांभीर्य लक्षात घेता विविध तज्ञ व्यक्तिंनी आपले अभ्यासात्मक दृष्टीकोन विकसित केलेले दिसतात. नोबेल पारितोषिक विजेते प्रा. अमर्त्य सेन यांच्या 'Food entitlement' या सिध्दांतामध्ये भूकबळीचे प्रमुख कारण हे अन्नाची अनुपलब्धता हे सांगितले आहे. प्रामुख्याने हा सिध्दांत अस्वच्छ अन्न व अन्नाची अतितम किंमत व लोकांची ते विकत घेण्याची घटलेली क्षमता या मुलभूत आधारावर अवलंबलेला दिसून येतो. या सिध्दांतामध्ये अन्न निर्मिती व संरचनात्मक दारिद्र्य यांच्यावर प्रामुख्याने भर दिलेला दिसतो.

प्रा.वॅट्स यांच्या मंदी व संघर्ष या सिध्दांतामध्ये संरचनात्मक मंदी यावर प्रकाश टाकलेला दिसतो. या सिध्दांतामध्ये वॅट्स असे मत मांडतात की जागतिक आर्थिक प्रगती ही प्रामुख्याने भुकमंदीमुळे रोढावलेली आहे कि जेथे विकसनशील देश हे जागतिक धोरणावर अवलंबलेले दिसून येतात. वॅट्स यांच्या सिध्दांताचा जागतिक व्यवस्थेच्यादृष्टीकोनातून पाहिले असता आपणास विकास, जागतिक सत्तेची रुची आणि अन्न सुरक्षा या संकल्पना प्रदर्शित होताना दिसतात.

Wallersteins यांच्यामते, राज्य व देश हे अन्नसुरक्षेचा अभ्यास करताना त्यामध्ये होणारा बदल अनुभवण्यासाठी फार तोकडे असल्याचे जाणवते. राज्य व देश ह्या स्वयंसमाविष्ठ पध्दती नाहीत त्यांचा विकास हा परस्पर भिन्न प्रकारे होत असताना दिसतो. परंतु राज्य व देश हे एकुणच पध्दतीचे घटक असल्याचे दिसते.

म्हणूनच एकंदररित्या अन्नसुरक्षा समस्येचा अभ्यास विकसनशील देशांच्या अंतर्गत राहून सर्वसमावेशक सिध्दांतानुसार कि जो वरील सर्व सिध्दांताचा अंतर्भाव असेल. वरील सर्व सिध्दांताचा विचार करता भारत हा विकसनशील देश असून भारतातील अन्नसुरक्षा अभ्यासणे योग्य ठरते.[4]

**भारतातील अन्न सुरक्षेचीवाटचाल–**

भारतातील अन्नधान्य टंचाईला ब्रिटिशकालीन पार्श्वभूमी आहे. 1935 मध्ये ब्रम्हदेश व 1947 व पाकिस्तान भारतातून वेगळा झाल्यामुळे व सुपिक जमिनीचा बराचसा भाग त्या देशामध्ये गेल्यामुळे आपल्या देशामध्ये अन्नधान्य टंचाईची समस्या तीव्र बनली. भारतामध्ये अन्न सुरक्षा दृष्टीकोनातून सरकारी पातळीवर 1943 मध्ये अन्नधान्य चौकशी समिती, 1947 मध्ये अन्नधान्य धोरण समिती, 1950 मध्ये अन्नधान्य अधिप्राप्ती समिती, भारतीय राज्य घटनेतील कलम 21, 1956 पासून अमेरिकेतील पीएल480 कलमाअंतर्गत गव्हाची आयात, 1965–66 मध्ये हरित क्रांतीची सुरुवात, 2007–08 पासून राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान, 4 जून 2009 रोजी केंद्रीय ग्राहक गतविधी अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयाने राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा बाबत टिपणे जाहिर केली व परिणामी 2013 मध्ये अन्न सुरक्षा विधेयक 2013 अंमलात आले.

**राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा – 2013**

अन्न, वस्त्र, निवारा ह्या माणसाच्या मुख्य गरजा आहेत. त्या तो आपल्या जीवनात पूर्ण करण्याचा प्रयत्न करतो. भारतात 'Below poverty line' दारीद्रय रेषेखालील लोकांची संख्या मोठया प्रमाणात आहे. सरकारचा प्रयत्न आहे की देशातील प्रत्येक व्यक्तिला अन्न मिळणे गरजेचे आहे. कुणीही भूकी राहता काम नये याच उद्देशाने केंद्र सरकारने अन्नसुरक्षा कायदा 2013 मध्ये संमत केला आहे त्यास राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा असे म्हटले आहे. तो भारतातील सर्वांसाठी आहे. केंद्र सरकारबरोबरच सर्व राज्यांनी हा कायदा संम्मत केलेला आहे. या कायदयात काय म्हटले आहे ते समजणे गरजेचे आहे.

1. कलम 4 च्या उपकलम 1 चे 5 व 6 नुसार अंगणवाडयांना समविष्ट केले आहे.
2. कमीतकमी दराने केंद्रसरकार व राज्य सरकारकडून अन्नपुरवठा मुख्य अन्नवाटप प्रणाली, इतर कल्याणकारी योजना, आपत्कालीन मदत यांचा समावेश.
3. घरातील अन्न व अंत्योदय अन्न योजनेचा समावेश कलम 3 च्या उपकलम 1 मध्ये समाविष्ट केली आहे.
4. 1955 च्या कायदयानुसार अत्यावश्यक सेवा अंतर्गत या दुकानांना अत्यावश्यक वस्तू विकण्याचे लायसेन्स उदा. रेशन चा समावेश सामुदायीक वाटप योजनेत समाविष्ट आहे.
5. अन्नधान्य म्हणजेच तांदूळ, गहू व इतर धान्याची योग्यता केंद्र सरकारकडून वेळोवेळी ठरविली जाते.
6. अन्न सुरक्षा म्हणजेच चांगल्या दर्जाचे धान्याचा उतलेख अध्याय दोन मध्ये घेतले आहे.
7. अन्नसुरक्षा तनखा जो व्यक्तिला दिला जातो. तो राज्य सरकारने देण्याचे कलम 13 ने ठरविण्यात आले आहे.



Scanned by CamScanner

 ISBN : 978-93-24457-18-4

8. स्थानिक स्वराज्य संस्था उदा. पंचायत समिती, नगरपालीका, जिल्हा बोर्ड, कॅंटोन्मेंट, टाऊनप्लॅनींग अधिकारी तसेच ज्या राज्यात उदा. आसाम, मणिपूर, मेघालय, मिझोराम, नागालॅंड, त्रिपुरा या ठिकाणी पंचायत अस्तित्वात नसल्याने ग्रामपंचायतीला अधिकार तूर्तास दिले आहेत.
9. भोजन म्हणजे शिजवलेली अन्न, तयार अन्न किंवा घरी नेण्याचे रेषन केंद्र सरकारने ठरविले आहे.5

वरील विधेयकातील तरतुदीनुसार शासनाने परामर्श घेतलेल्या बाबींची कल्पना येते.

**अन्नसुरक्षा व आव्हाने –**

राष्ट्रीय अन्न सुरक्षा विधेयकाची अंमलबजावणी करीत असताना पुढील प्रमुख आव्हानांना सामोरे जावे लागेल.

1. सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संगणकीकरण करणे.
2. सार्वजनिक वितरण व्यवस्थेत योग्य लाभार्थ्यांची निवड करणे.
3. अन्नधान्याचा योग्य साठवणूक व देखभालीची सुविधा निर्मिती करणे.
4. अन्नधान्याची नासडी थांबविणे.
5. अन्न सुरक्षा योजनेच्या कार्यवाहीतील भ्रष्टाचारास आळा घालणे.
6. अन्नधान्य व्यवस्थापन कार्यक्षमता वाढविणे.
7. जन जागरुकता व आधुनिक दृष्टीकोन विस्तार करणे.
8. भूकबळी, कुपोषण, दारिद्रय या समस्यांवर योग्य इलाज करणे.
9. खादय पदार्थांमध्ये विषारी कृषी रसायनांचा वाढता अवलंब रोखणे.
10. हवामानातील बदलानुसार कृषी उत्पादनात वाढीसाठी संशोधन घडवून आणणे.



Scanned by CamScanner